दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
# रायगड नगरी
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित
● वर्ष १७ वे ● अंक २६७ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● मंगळवार दि.२७ डिसेंबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## आयटीआयच्या विद्यार्थ्यांना पाचशे रुपये विद्यावेतन तीन महिन्यात लागू करणार

**दै.रायगड नगरी । नागपूर**

राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील (आयटीआय) विद्यार्थ्यांच्या विद्यावेतन ४० रुपयांवरुन ५०० रुपये करण्यात येणार आहे. येत्या तीन महिन्यात विद्यावेतन लागू करण्यात येईल, अशी माहिती कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी विधान परिषदेत दिली. सदस्यांनी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनात वाढ करण्याबाबत प्रश्न उपस्थित केला होता. त्याला उत्तर देतांना मंत्री श्री. लोढा बोलत होते.

मंत्री मंगलप्रभात लोढा पुढे म्हणाले, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांचे विद्यावेतन सन १९८२ पासून ४० रुपये आहे. यात वाढ करुन पाचशे रुपये करण्याचा प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्याची कार्यवाही विभागाच्या स्तरावर सुरू आहे. खासगीच्या तुलनेत शासकीय आयटीआयचे प्रवेश शुल्क कमी आहे. विद्यार्थ्यांना चांगल्या सुविधा देण्याचा प्रयत्न सुरु आहे. औद्योगिक प्रशिक्षण संस्था बळकट करून १०० टक्के प्रवेश होण्यासाठी राज्य शासन प्रयत्न करीत आहे.

# पनवेल अर्बन बँकेच्या अध्यक्षपदी बाबुराव पालकर तर उपाध्यक्षपदी जनार्दन पाटील

## सन २०२२ ते २०२७ कार्यकाळासाठी संचालक मंडळाची स्थापना

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**दि.पनवेल को-ऑपरेटिव्ह अर्बन बँकेच्या अध्यक्षपदी बाबुराव पालकर तर उपाध्यक्षपदी जनार्दन पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पनवेल अर्बन बँकेत आज (सोमवार दि.२६ डिसेंबर) निवडणूक निर्णय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक बालाजी वाघमारे यांच्या देखरेखीखाली अध्यक्ष व उपाध्यक्ष पदाची निवडणूक पार पडली. अर्बन बँकेच्या तेरा पैकी तेरा जागांवर महाविकास आघाडीच्या उमेदवारांनी विजय मिळवला असल्याने महाविकास आघाडीतील नेतेमंडळींच्या सहमताने अध्यक्षपदी शेकापचे बाबुराव पालकर तर उपाध्यक्षपदी काँग्रेसचे जनार्दन पाटील यांची बिनविरोध निवड करण्यात आली.**



पनवेल अर्बन बँकेच्या सन २०२२ ते २०२७ या पंचवार्षिक कार्यकाळात अध्यक्षपदी शेकापचे बाबुराव पालकर, उपाध्यक्षपदी काँग्रेसचे जनार्दन पाटील यांच्यासह संचालक शेकापचे दिलीप कदम, अनिल केणी, राजेश खानावकर, हितेन शहा, बी पी म्हात्रे, पांडुरंग भागिवंत, काँग्रेसचे अरविंद सावळेकर, विमल गायकवाड, राष्ट्रवादी काँग्रेसच्या विद्या चव्हाण तर शिवसेनेचे ज्ञानेश्वर बडे व प्रवीण जाधव हे कामकाज पाहणार आहेत.

याप्रसंगी पनवेल-उरण महाविकास आघाडीचे अध्यक्ष बबनदादा पाटील, शिवसेना जिल्हाप्रमुख शिरीष घरत, माजी नगराध्यक्ष जे एम म्हात्रे, पनवेल शहर काँग्रेस जिल्हाध्यक्ष अभिजीत पाटील, काशिनाथ पाटील, राष्ट्रवादीचे प्रदेश सरचिटणीस सुदाम पाटील, नारायणशेठ घरत, काँग्रेसचे जेष्ठ नेते जी आर पाटील, अनंत डी पाटील, मल्लिनाथ गायकवाड, गणेश कडू, हेमराज म्हात्रे, निलेश म्हात्रे, प्रताप गावंड, अरुण ठाकूर यांच्यासह नवनिर्वाचित संचालक मंडळ, महाविकास आघाडीतील नेतेमंडळी, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गेल्या ३० वर्षांपासून पनवेल अर्बन बँकेवर शेकापची सत्ता राहिली आहे. पनवेल अर्बन बँकेच्या निवडणूकीत महाविकास आघाडीने बाजी मारली असून आपले वर्चस्व कायम ठेवले आहे. एकूण १३ जागांसाठी २७ उमेदवार पनवेल अर्बन बँकेच्या निवडणुकीच्या रिंगणात होते. यामधील तेरा पैकी तेराही जागांवर महाविकास आघाडीच्या उमेदवारांनी दणदणीत विजय प्राप्त केला.

### वीजेची वाढीव देयके आणि इतर प्रश्नांवर...

# आ.प्रशांत ठाकूर यांनी वेधले शासनाचे लक्ष

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**पनवेल तालुक्यात वीज ग्राहकांना महावितरणकडून वाढीव देयके आणि इतर प्रश्नांबाबत आमदार प्रशांत ठाकूर यांनी नागपूर येथे सुरु असलेल्या विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात लक्षवेधी सूचनेद्वारे आवाज उठविला.**

सन २०२०-२१ मध्ये बिलिंग च्या तक्रारी १० लाख २२ हजार होत्या, त्या २०२१-२२ मध्ये ४ लाख ५८ हजार आणि आता डिसेंबर अखेरपर्यंत २ लाख ७२ हजारपर्यंत राहिलेल्या आहेत. मीटर रीडर कामात बदमाशी करायचे त्यामुळे वीज ग्राहकांना त्याचा फटका बसायचा. एमएससीडीसीएलचा मी मनापासून अभिनंदन करेल की अतिशय चांगलं काम यामध्ये कंपनीने केलेला आहे आणि त्यामुळे वीज देयक वसुली देखील वाढली आहे. अनेक काळापासून फ्रॅन्चाइसी आपण देतो. भिवंडी, मुंब्रामध्ये फ्रेंचाईजी दिली आहे कारण फ्रेंचाइजीमध्ये त्यांना आपण खाजगी काहीही देत नाही. तर या उलट त्याठिकाणी मोठ्या प्रमाणात इन्वेस्टमेंट होत आहे, त्या ठिकाणचे प्रश्न सुटून राहिलेत आणि ज्या ज्या ठिकाणी आपण फ्रेंचाई दिली आहे विशेषता भिवंडी आणि मुंब्र्यामध्ये विजेची उपलब्धता वाढलेली आहे त्या ठिकाणी लोकांच्या तक्रारी कमी झालेल्या आहेत आणि त्या ठिकाणी कुठलीही ओरड वीज ग्राहकांची नाही. आणि हे खाजगीकरण नसून फ्रेंचाइजीचा भाग आहे.

यावेळी, वीज ग्राहकांना देण्यात आलेली देयके दुरुस्त करण्यात येत असल्याचे शासनाने उत्तरात म्हंटले होते. त्या अनुषंगाने या उत्तरावर बोलताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी सभागृहात म्हंटले कि, प्रचंड प्रमाणामध्ये आज पनवेल आणि परिसराची लोकसंख्या वाढते आणि याच्यामध्ये मध्यमवर्गीय समाज मोठ्या प्रमाणावरती आहे. उत्तरात म्हटल्याप्रमाणे २६२५ देयके दुरुस्त केली गेलेली आहे, मग ज्या ग्राहकांना याचा मनस्ताप झाला त्या नागरिकांचा मनस्ताप वाढवणारे अधिकाऱ्यांवरती वीज वितरण कंपनी किंवा शासन काय कारवाई करणार आहे, तसेच कोरोनामुळे अनेक घरांचा बजेट बिघडलेला आहे अशा वेळेला एक महिन्याचे बिल भरले नाही तर ग्राहकांचा मीटर काढून नेला जातो वीज पुरवठा खंडित केला जातो, त्यामुळे या अनुषंगाने हा कालावधी एक महिन्याच्या ऐवजी दोन महिन्याच्या करण्याच्या संदर्भामध्ये शासन निर्देश देईल काय? त्याचबरोबर पनवेल विभाग आता भांडुप विभागाच्या अंतर्गत येतो आणि या भांडुप विभागामधल्या वीज वितरणाचा खाजगीकरण करण्याच्या संदर्भामध्ये शासनाने हरकती सूचना मागवल्यात आणि त्याला सगळ्या पद्धतीच्या ग्राहकांचा विरोध आहे आणि म्हणून शासनाची कंपनी जर सेवेचे उत्तर दायित्व स्वीकारत नाही अशी लोकांची भावना आहे तर खाजगी कंपनी कोणाला जुमानेल आणि त्यामुळे या निर्णयाचा शासन फेरविचार करेल काय असा सवाल आमदार प्रशांत ठाकूर यांनी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून केले.



यावेळी लक्षवेधी सूचनेवर उत्तर देताना राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले कि, वीज मीटरचा फोटो तपासणी करताना अस्पष्ट फोटोंचा प्रमाण संपूर्ण महाराष्ट्रात जानेवारी २०२२ मध्ये ४५. ६ टक्के होते. आणि ते आता प्रमाण आपण कमी करून नोव्हेंबर २०२२ मध्ये १. ९ टक्के पर्यंत आलेला आहे आणि त्यासोबत राज्यामध्ये सरासरी नुसार देयकाच प्रमाण जुलै २०२२ मध्ये ७.३ टक्के होतं ते आता आपण ५. ७ टक्के वर कमी आणले आणि ते आपण अजून कमी करण्यासंदर्भात प्रयत्नशील आहोत. पनवेल तालुक्यामध्ये आपण जर बघितलं तर साधारणपणे फेब्रुवारी २०२२ पर्यंत अस्पष्ट फोटोंचा प्रमाण हे १२ टक्के होते ते आता १. ३ टक्क्यावर आपण कमी आणलेला आहे. आणि त्यासोबत या ठिकाणी सरासरी देयके आहेत. त्याचं प्रमाण देखील मोठ्या प्रमाणात कमी आणलेला आहे. आता आपण जर बघितलं तर एकूण देयकांपैकी ४४०९ देयके आहेत. ती ०.२६ टक्के आहेत आणि त्रुटी आढळलेले जे काही देयके आहेत ते आता ०. १६ टक्के राहिलेली आहे त्यामुळे याच्यामध्ये गुणात्मक सुधारणा आता या ठिकाणी केली वीज महावितरणने केली आहे.

आपण जसं सांगितलं की काय कारवाई केली तर विश-ेषता याच्यामध्ये हे जे काही चुकीचं मीटर फोटो काढतात किंवा फोटो काढतच नाही आणि मग ते पाठवून देतात अशा प्रकारचे जे काम चाललेल्या तिथे पनवेलच्या या सगळ्या परिसरामध्ये आपण आत्तापर्यंत त्यांना ६ . ६० लाख रुपये एवढा दंड आकारला आहे आणि मोठ्या प्रमाणात म्हणजे महाराष्ट्रामध्ये मीटर रिडींगच्या ७६ एजन्सींना बडतर्फ केले आहे आणि तीन एजन्सीना काळ्या यादीत टाकलेले आहेत आणि त्यामुळे आता जे बिलिंग आहे त्याच्यामध्ये अतिशय गुणात्मक अशा प्रकारची वाढ ही आपल्याला या ठिकाणी पाहायला मिळते आहे.

## आमच्याकडे बरेच बॉम्ब, वातीही काढल्यात, आता पेटवण्याची गरज : उद्धव ठाकरे



**दै.रायगड नगरी । नागपूर**

आमच्याकडे बॉम्ब बरेच आहेत. वाती काढल्या आहेत. आता पेटवण्याची गरज आहे. परंतु सीमाभागात लाखो मराठी भाषिकांवर अन्याय होतोय त्यावर ठराव मांडणं गरजेचे आहे. तुम्ही आमच्यात असताना लाठ्या काठ्या खाल्लया म्हणून तुम्ही आता गप्प बसा असं होत नाही.

केंद्रशासित भाग होत नाही तोपर्यंत या मुद्द्यावर उत्तर नाही. हे अनैतिक सरकार असल्याने त्यांच्याकडून नैतिकता अपेक्षित नाही अशा शब्दात आमदार उद्धव ठाकरे यांनी सरकारवर टीकास्त्र सोडलं आहे.

उद्धव ठाकरे म्हणाले की, शेतकरी उघड्यावर सोडलेला आहे. मुख्यमंत्र्यांच्या दिल्लीवाऱ्या सुरू आहेत. मुख्यमंत्री हिंदुत्व मानणारे आहेत. म्हणून वारंवार देवदर्शनाला जातात. त्यामुळे त्यांना नवस करणं आणि फेडणे यासाठी दिल्लीला जावं लागतं. आजचा दिवस गेला म्हणून नवस फेडतायेत आणि उद्याचा दिवस नीट जाऊ द्या यासाठी नवस करतात. त्यात महाराष्ट्राचे भले कुठे आहे? दिल्ली वाऱ्यांमध्ये सीमाप्रश्न आणि महाराष्ट्राचा फायदा काय झाला? अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले. कुठे पंचनामे झाले? कुठे मदत मिळाली? महाराष्ट्रातील प्रत्येक प्रश्न आम्ही मांडले आहेत. परंतु त्यावर किती चर्चा होतेय हे सगळ्यांना माहित्येय. अधिवेशनाचे ७ दिवस कुणी वाया घालवले? ज्याने वाया घालवले त्याला जाब विचारा असं त्यांनी म्हटलं.

# कोरोना रोखण्यासाठी महापलिकेची तयारी सुरू





**दै.रायगड नगरी । पनवेल**

चीनसह अनेक देशांमध्ये कोरोनाबाधितांच्या वाढत्या संख्येत वाढ होत असल्याच्या पार्श्वभूमीवर आयुक्त श्री.गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली वैद्यकिय आरोग्य विभागाच्यावतीने विविध पातळ्यांवरती तयारी करण्यास सुरूवात केली आहे.

कळंबोली येथे कोविड समर्पित रूग्णालय सुरू करण्याच्या दृष्टीने तयारी सुरू करण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या आहेत तसेच महापालिका स्वत:ची आरटीपीसीआर लॅब सुरू करणार आहे. आरटीपीसीआर चाचण्यांमध्येही वाढ करण्यात येणार आहे. या सर्वासाठी लागणाऱ्या मनुष्यबळाचे नियोजन वैद्यकिय आरोग्य विभागच्या वतीने करण्यात येत आहे.

महापालिकेचे पहिल्या डोसचे १०९ टक्के, दुसऱ्या डोसचे १०२ टक्के तसेच बुस्टर डोसचे १७ टक्के लसीकरण झाले आहे. महापालिकेच्या सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये कोवॅक्सीन लसीकरण सुरू असून ज्या नागरिकांचा लसीकरणाचा दुसरा डोस राहीला आहे, त्यांनी लसीकरण करून घ्यावे तसेच बुस्टर डोसचे लसीकरणही महापालिकेच्यावतीने करण्यात येत आहे. नागरिकांनी बुस्टर डोसचे लसीकरण करून असे आवाहन करण्यात येत आहे. सार्वजनिक ठिकाणी मास्कचा वापर, गर्दीमध्ये इतरांपासून सुरक्षित अंतर राखणे, सातत्याने हात धुणे , आजारी असल्यास घरी अलगीकरणात रहाणे या प्राथमिक गोष्टीची खबरदारी घेण्याचे आवाहन महापालिकेने केले आहे.

# सिडकोच्या अतिक्रमण विरोधी पथकाला कोटगावच्या शेतकऱ्यांनी माघारी पाठविले

## बांधकामे निष्कासित करण्याला शेतकऱ्यांचा विरोध

**दै.रायगड नगरी । उरण**

अनधिकृत बांधकाम विभाग सिडको यांनी दि. २२ डिसेंबर २०२२ रोजी अनधिकृत बांधकाम धारक,भाडेकरू,वखार धारक यांच्या वर एम आर टी पी कायद्या अंतर्गत नोटीसा पाठविल्या होत्या. त्या निमित्ताने जेएनपीए टाऊनशिप समोरील अनाधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आली.

उरण तालुक्यातील काळाधोंडा येथील सर्व्हे नंबर ४ हिस्सा नंबर २ येथील मयतासाठी लागणाऱ्या लाकडाच्या वखारीला सिडकोने ५३(१)(ब) खाली नोटीस बजावुन कारवाई करण्यासाठी आले होते. प्रत्यक्ष वखारीचे पुरावे नष्ट करण्यासाठी आले होते.सिडको अधिकारी लक्ष्मीकांत डावरे यांना या नोटीस संबंधी वखार धारक, शेतकरी कोटनाका ग्रामस्थ,चारफाटा ग्रामस्थ कोळी संघटना, ओबीसी नेते राजाराम पाटील यांनी जोरदार विरोध केला.

नोटीस वरती वखार धारकाचे नाव नाही.नोटीस वर दिनांक नाही.रीतसर चाळीस पंचेचाळीस वर्षे नियमित चाणजे ग्रामपंचायत मध्ये सदर ठिकाणी राहणारे नागरिक कर भरतात त्याची सर्व कागद पत्रे नागरिकांकडे होती तरी त्या ठिकाणी सिडकोचे अतिक्रमण पथक कारवाई करायला आले होते. काळाधोंडा या ठिकाणी जुनी वखार आहे त्या ठिकाणी सिडकोचे अतिक्रमण पथक आले तेंव्हा सर्वांनीच जोरदार प्रतिकार केला.तेव्हा सिडको पथकाचे अधिकारी लक्ष्मीकांत डावरे म्हणाले उरण बायपास रस्त्याते कामात अडथळा आणू नका.

यावेळी सर्व प्रकल्प बाधीत आंदोलक म्हणाले की उरण बायपास रस्ता प्रत्यक्ष काळाधोंड सव्हे नंबर ८ हिस्सा नंबर १ मध्ये आहे.आमचा सव्हे नंबर ४ हिस्सा नंबर २ आहे .आमचे पुनर्वसन करा. पर्यायी जागा द्या. पुनर्वसन कायदा २०13 व संविधान आरटीओ २१ प्रमाणे आम्हाला न्यायालयात जाण्यासाठी पुरेपूर संधी देऊन मुदत द्या . नाताळच्या सुट्टी मुळे कोर्ट बंद आहेत तरी आम्हाला कायदेशीर मार्गाने न्यायालयात जाण्यासाठी मुदत द्यावी. २४ तासाच्या आत मध्ये तोडक कारवाई थांबवावी नाहीतर आम्ही सर्व आमच्या अस्तित्वासाठी रस्त्यावर उतरून सिडको विरुद्ध लढा देऊ. ह्या मुळे सिडको अधिकारी लक्ष्मीकांत डावरे यांनी मुदत वाढवून दिली आणि कारवाई थांबवली.

सिडको क्षेत्रातील गावकऱ्यांनी नवी मुंबई शहरासाठी आपल्या पिकत्या शेत जमिनी दिल्या आहेत. आता त्याची विस्तारतीत गावठाण जमीन मालकी हक्काने देणे हे शासनाचे कर्तव्य ठरते. परंतु गावठाण विस्ताराची जबाबदारी सिडको, जिल्हाधिकारी, कोकण आयुक्त, महानगर पालिका प्रशासनाची आहे. चुकीच्या भू संपादन मुळे लोकांच्या राहत्या घरांवर सिडको मार्फत हातोडा पडत आहे.प्रत्येक प्रकल्पग्रस्त,शेतकरी ,भाडेकरू, आणि स्थानिक यांनी आपल्या न्याय हका साठी रस्त्यावर उतरावे आणि आपल्याला अतिक्रमणे च्या नावाखाली सिडको तोडक कारवाई करते त्यासाठी न्यायालयीन लढाई लढावी असे आवाहन ओबीसी नेते राजाराम पाटील यांनी यावेळी केले.यावेळी कोटगाव ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# ब्रह्मास्त्राच्या लक्ष्मणरेषा

भारतात आज माहितीच्या अधिकाराचा व्यापक कायदा आहे. २००५ मध्ये झालेल्या या कायद्यामागे लोक आंदोलनाचा इतिहास आहे. त्यानंतर २०१३ मध्ये केंद्र सरकारने लोकपाल-लोकायुक्त या व्यवस्थेसाठी नवा कायदा केला. या कायद्यालाही आता एक दशक पुरे होईल. माहितीच्या अधिकाराचा कायदा येऊन तर काही काळाने दोन दशके पुरी होतील. देशात हे दोन्ही कायदे होण्यामागे ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांचा आग्रह, त्यांनी छेडलेली आंदोलने आणि सातत्याने लावून धरलेला आग्रह यांचा फार मोठा वाटा आहे. अण्णांचे हे योगदान कधीही विसरता येणार नाही. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राच्या विधिमंडळात सादर झालेल्या नव्या लोकायुक्त कायद्याची दखल घ्यावी लागेल. हे विधेयक राज्य सरकारने विधिमंडळासमोर ठेवले असून ते आता मंजूर होईलच. मात्र, या नव्या व्यवस्थेमुळे उच्चपदस्थांचा संभाव्य भ्रष्टाचार किती वेगाने आणि कितपत आटोक्यात राहील, असा प्रश्न निर्माण झाला आहे. माहितीच्या अधिकाराने सर्वसामान्य नागरिकांच्या हातात जे शस्त्र मिळाले, त्याने देशाच्या समग्र व्यवस्थेची गुणवत्ता नेमकी किती सुधारली आणि मुख्य म्हणजे, समाजातील अगदी शेवटच्या, तळागाळातील कुटुंबांचे दैनंदिन जीवन किती प्रमाणात सुखावह झाले, याचा निष्पक्ष ताळा कधीतरी मांडण्याची गरज आहे. हा ताळा अपेक्षाभंग करण्याचीच शक्यता अधिक आहे. महाराष्ट्राच्या विधिमंडळाने विधेयकाला मंजुरी दिल्यानंतर जो नवा लोकायुक्त कायदा अस्तित्वात येणार आहे; त्यानुसार, विद्यमान किंवा माजी मुख्यमंत्र्यांच्या विरोधात लोकायुक्तांना एखादी चौकशी करायची असेल तर विधानसभेची पूर्वपरवानगी आवश्यक ठरणार आहे. याच मसुद्यातील तरतुदीप्रमाणे मंत्रिमंडळातील मंत्र्यांच्या विरोधात चौकशी करावयची असेल तर राज्यपालांची अनुमती आवश्यक असेल. याशिवाय, विधानसभा सदस्य किंवा विधान परिषद सदस्य यांच्यावरील आरोपांची चौकशी लोकायुक्तांना करावयाची असेल तर त्या त्या सभागृहाच्या पीठासीन अधिकाऱ्याची म्हणजे अनुक्रमे अध्यक्ष व सभापतींची संमती लागेल. या सगळ्या तरतुदी लोकायुक्त या व्यवस्थेची स्वायत्तता जपणाऱ्या आहेत, असे कुणीही म्हणणार नाही. कोणते राज्य सरकार, कोणते राज्यपाल किंवा कोणते सभापती वा अध्यक्ष अशी परवानगी सुखासुखी देतील? राजकीय संघर्षात सत्ताधारी आणि विरोधक हे एकमेकांच्या जिवावर उठल्यासारखे दिसत असले तरी समान स्वार्थाचे अंकगणित सोडवायचे असते तेव्हा परस्परांच्या साहचर्याला ऊत येतो. तेव्हा एखादे माजी मुख्यमंत्री दुसऱ्या पक्षाचे होते, म्हणून विधानसभेत असे ठराव मंजूर होतील किंवा अध्यक्ष व सभापती सदस्यांच्या चौकशीला मान्यता देतील, ही शक्यता फारच कमी आहे. मग लोकायुक्त कार्यालयाचा सारा भर काय फक्त नोकरशहांच्या विरोधात येणाऱ्या तक्रारींवर असणार की काय? केंद्राच्या लोकपाल कायद्याच्या कक्षेत पंतप्रधान, केंद्रीय मंत्री आणि सारेच अधिकारी येतात. त्या कायद्यातील तरतुदीनुसार आंतरराष्ट्रीय संबंध, देशाची सुरक्षितता, अणुऊर्जा किंवा तत्सम संवेदनशील विषय असतील तर लोकपालांच्या एकूण पीठासीन सदस्यांपैकी दोन तृतीयांश सदस्यांची संमती लागते. मात्र, लोकपालांच्या कक्षेत सारेच निरपवाद येतात. राज्यातही तशी यंत्रणा करायला हवी होती. तक्रारींची चौकशी करण्यासाठी सभागृहांची किंवा राज्यपालांची पूर्वानुमती आवश्यक असणे, याचाच अर्थ लोकायुक्तांच्या अंगभूत अधिकारांना कात्री लावण्यासारखे आहे. यातून भ्रष्टाचाराच्या विरोधातली लढाई जिंकता येणार नाही. माहितीचा अधिकार किंवा लोकपाल-लोकायुक्त कायद्यांचे लक्ष्य हे दुहेरी असते. भ्रष्टाचार हा त्यातला एक मुद्दा झाला. दुसरा मुद्दा सुशासनाचा आहे. नोकरशाही, प्रशासन आणि सरकार यांनी जनतेला सुशासन द्यायला हवे. लोकांचे प्रश्न वेगाने मार्गी लागायला हवेत आणि सामान्य माणसे फायलींच्या जंगलात गुदमरून अर्धमेली होता कामा नयेत. मात्र, या कायद्यांचे हे उद्दिष्ट नोकरशाहीला किंवा सरकारांना समजले आहे, असे वाटत नाही. माहितीचा कायदा किंवा लोकायुक्त कायदा हा लोकशाहीचा प्राणवायू आहे; अशी संवादफेक टाळ्या मिळवू शकते पण प्रत्यक्षात सामान्य नागरिकांना प्राणवायू पुरवठा होतो की त्या नळ्या काढून घेतल्या जातात; हाही प्रश्नच आहे. नोटबंदी झाल्यानंतरही आज देशात किमान २५ लाख कोटी रुपयांचा काळा पैसा असेल आणि दरवर्षी त्यात भरच पडत राहील, असे आजही अर्थशास्त्री सांगतात. हा इतका प्रचंड काळा पैसा येतो कुठून? त्याच्या जन्मात सरकारी खाती, अधिकारी, व्यवस्था आणि यंत्रणा यांचा कितपत वाटा असतो? जर तसा तो असेल तर कितीही नवनव्या कल्पक व्यवस्था उभ्या केल्या तरी खरोखरच यश मिळेल का? माहितीचा अधिकार आणि लोकायुक्त-लोकपाल ही भारतीय लोकशाहीतील नागरिकांच्या हातात आलेली ब्रह्मास्त्रे आहेत, असे अण्णा हजारे अनेकदा सांगतात. ते तत्त्वत: खरेही आहे. मात्र, ही ब्रह्मास्त्रे खरोखरच लक्ष्यभेद करण्यात आजवर यशस्वी झाली आहेत का? तशी ती झाली नसतील तर लोकायुक्तांची नवी व्यवस्था उभी केल्याचे केवळ मानसिक समाधान आणि प्रचाराचे निमित्त तेवढे मिळेल. या ब्रह्मास्त्रांच्या भोवती अनेक लक्ष्मणरेषा आखून ठेवल्या तर त्यांचा प्रभाव तो काय पडणार?

# महाराष्ट्राचा ५६वा वार्षिक निरंकारी संत समागम औरंगाबादमध्ये स्वेच्छा सेवांचा शुभारंभ

**दै.रायगड नगरी । औरंगाबाद**

महाराष्ट्राच्या ५६व्या वार्षिक निरंकारी संत समागमाचे भव्य आयोजन निरंकारी मिशनच्या प्रमुख सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज यांच्या पावन सान्निध्यात दिनांक २७, २८ व २९ जानेवारी, २०२३ रोजी औरंगाबाद येथील बिडकीन दिल्ली-मुंबई इंडस्ट्रीयल कॉरिडॉर येथे होणार आहे. या समागमाच्या पूर्वतयारीसाठी स्वेच्छा सेवांचा शुभारंभ रविवार, दिनांक २५ डिसेंबर रोजी झाला असून त्याचे विधिवत उद्घाटन परम् आदरणीय श्री.मोहन छाब्रा मेंबर इंचार्ज, ब्रांच प्रशासन, संत निरंकारी मंडळ, यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

या उद्घाटन समारोहाची सुरवात सद्गुरु माता जी व निरंकार प्रभुचरणी हा समागम यशस्वीरित्या पार पडावा या हेतुने प्रार्थना व नमन या रुपात करण्यात आला. या सोहळ्यामध्ये दिल्लीहून संत निरंकारी मंडळाच्या वित्त व लेखा विभागाचे मेंबर इंचार्ज श्री जोगिंदर मनचंदाजी यांच्यासह समागम समितीचे चेअरमन, समन्वयक, अन्य सदस्य तसेच महाराष्ट्रातील विविध झोनचे प्रभारी आणि सेवादलचे क्षेत्रीय संचालक व अन्य अधिकारी उपस्थित होते.

औरंगाबाद तसेच आजुबाजुच्या परिसरातून आणि मुंबई व महाराष्ट्राच्या अन्य ठिकाणाहून हजारोंच्या संख्येने निरंकारी सेवादल महिला व पुरुष स्वयंसेवक आणि अन्य भक्तगण या उद्घाटन समारोहामध्ये सहभागी झाले होते.

उद्घाटन प्रसंगी आपले शुभभाव व्यक्त करताना पूज्य श्री.मोहन छाब्राजी म्हणाले, की संत निरंकारी मिशन हे सत्य, प्रेम, शांती, मानवता आणि विश्वबंधुत्वाचे मिशन आहे. मिशनचा हा दिव्य संदेश प्रसारित करुन मानवाला मानवाशी जोडण्याचे कार्य या संत समागमाच्या माध्यमातून केले जाणार आहे. पुरातन काळापासून संत, गुरु-पीर-पैगंबरांनी जो आध्यात्मिकता व मानवतेचा संदेश जगाला दिला तोच संदेश आज वर्तमान सद्गुरु माता सुदीक्षा जी महाराज विश्वभर देत आहेत. या संत समागमाचाही हाच मुख्य उद्देश आहे.

उल्लेखनीय आहे, की यापूर्वी महाराष्ट्राच्या वार्षिक निरंकारी संत समागमांची श्रृंखला सन २०१९ पर्यंत मुंबई महानगर परिक्षेत्रातच आयोजित होत आली. जानेवारी, २०२० मध्ये ५३वा समागम प्रथमच मुंबईबाहेर नाशिकमध्ये आयोजित केला गेला आणि त्यानंतर दोन वर्षे कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे २ संत समागम व्हर्च्युअल रूपात आयोजित करण्यात आले जे समस्त भक्तगणांनी प्रभू इच्छा समजून गोड मानून घेतले आणि घरबसल्याच त्या समागमांचा आनंद प्राप्त केला.

आनंदाची हीच दिव्य अनुभूती पुनश्च जागृत करण्याच्या हेतुने यावर्षी ५६वा वार्षिक निरंकारी संत समागम भव्य-दिव्य रुपात औरंगाबादमध्ये आयोजित करण्यात येत आहे ज्याचे संपूर्ण निरंकारी जगत साक्षी होईल.




# नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी पक्ष वाढीसाठी मेहनत घ्यावी : शिरीष घरत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी पक्ष वाढी साठी मेहनत घ्यावी असे आवाहन शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे) जिल्हाप्रमुख रायगड शिरीष घरत यांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना केले आहे .



शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशानुसार, शिवसेना नेते, संपर्कनेते कोंकण विभाग सुभाष देसाई यांच्या मार्गदर्शनानुसार, तसेच शिवसेना जिल्हाप्रमुख रायगड शिरीष घरत यांच्या नेतृत्वाखाली पाली देवद तालुका-पनवेल, (रायगड जिल्हा) शिवसेना उपविभाग प्रमुख नितीन अनंत पाटील, उप शाखा प्रमुख विहीघर गजानन रामभाऊ पाटील, बुथ प्रमुख विहीघर संतोष शालिक हरड, बुथ प्रमुख विहीघर सुनिल काशिनाथ फडके, गट प्रमुख विहीघर संतोष बाबुराव पाटील सर्वांची या पदी नियुक्ती करण्यात आली आहे. यावेळी उपजिल्हा प्रमुख भरत पाटील, तालुका संपर्क प्रमुख योगेश तांडेल, पनवेल महानगर सन्मवयक दिपक घरत, उपशहर प्रमुख नविन पनवेल ज्ञानेश्वर भंडारी, विभाग प्रमुख अनिल तळवणकर, शिवसैनिक आदईचे विष्णु शेळके आदी पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते.

# पनवेल महानगरपालिकेच्या आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहामध्ये मराठी नाटकांना भाडे सवलत

**दै.रायगड नगरी । पनवेल**



कोविड-१९ च्या काळात मराठी नाट्य व्यवसायावर आलेली मरगळ दूर होऊन मराठी नाट्य व्यवसायास ऊर्जितावस्था यावी म्हणून पनवेल महानगरपालिका मालकीच्या आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहामध्ये मराठी नाटकांच्या भाडेदरांमध्ये ७५ टक्के सवलत देण्याचा निर्णय आयुक्त तथा प्रशासक श्री. गणेश देशमुख यांनी घेतला आहे.

मागील दोन वर्षामध्ये कोविड-१९मुळे मराठी नाट्य व्यवसायाला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत होते. या समस्यांवर मात करत पुन्हा एकदा नव्या ताकदीने उभारण्याकरिता महाराष्ट्र राज्याच्या सांस्कृतिक खात्याकडून दैनंदिन भाडेदरांमध्ये ७५ टक्के सवलत देण्याविषयीचे पत्र महापालिकेस मिळाले होते.

त्यास अनुसरून पनवेल महानगरपालिकेकडून याबाबत प्रशासकीय सर्वसाधारण सभेत ठराव पारित करण्यात आला आहे. या ठरावामध्ये पनवेल महानगरपालिका मालकीच्या आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात मराठी नाटकांकरीता दैनंदिन भाडेदरामध्ये दिनांक ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत ७५टक्के सवलत मंजूर करण्यात आली आहे.



स्नेहकुंज आधार गृह नेरे येथे व्हि.के. हायस्कूल मित्रांची भेट

# खारघरमध्ये रंगला श्वानांचा फॅशन शो

**दै.रायगड नगरी । पनवेल**

विविध ठिकाणी फॅशन शो आपण ऐकत असतो. या फॅशन शो मध्ये मानवनिर्मित विविध कपडे, त्यांचे प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती आपण पाहत असतो. मात्र खारघर शहरातील सेंट्रल पार्क मध्ये चक्क श्वानांचा आगळा वेगळा फॅशन शो चर्चेचा विषय ठरला. शहरातील खारघर डॉग पार्क ऑर्गनायझेशनच्या पुढाकाराने हा शो पार पडला.

शहरातील सेंट्रल पार्क हा तब्बल १०० एकरात पसरलेला आहे.विविध प्रकारच्या एक्टिव्हीटी याठिकाणी दररोज होत असतात.याठिकाणाला दररोज शेकडो नागरिक भेट देतात. यापैकीच काही पाळीव प्राणी प्रेमी नागरिक देखील आहेत. या पार्कच्या एका भागाला डॉग पार्क नाव देऊन या नागरिकांनी ख्रिसमस निमित्ताने हा फॅशन शो भरवला होता. यावेळी वेगवेगळ्या प्रजातीच्या कुत्र्यांना सुंदर वेशभूषा परिधान करून त्यांचे फॅशन आयोजित करण्यात आले. या दरम्यान या पाळीव कुत्र्यांना(श्वानांना) डेनिम, फ्रॉक, सांता क्लॉज, रॉक स्टारची वेशभूषा परिधान करून त्यांचे फॅशन शो याठिकाणी पार पडले. तब्बल ७२ पाळीव कुत्रांचा या शो मध्ये सहभाग होता. खारघर नवी मुंबई परिसरात प्रथमच अशाप्रकारचा फॅशन शो पार पडला. या आगळा वेगळा फॅशन शो पाहण्यासाठी सेंट्रल पार्क मध्ये उपस्थित असलेल्या नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. या शो मध्ये सहभागी झालेल्या पाळीव मुत्र्यांच्या मालकांना प्रशस्तिपत्रक देऊन सन्मानित करण्यात आले.या छोटेखानी कार्यक्रमाला उस्फुर्त प्रतिसाद मिळाल्याची माहिती आयोजक नुपुरा चव्हाण यांनी दिली. जे लोक कुत्रा पाळतात ते तो आपल्या घरचा सदस्य असल्याप्रमाणेच त्याची काळजी घेतात. श्वान सुद्धा आपल्या मालकांवर जीवापेक्षाही जास्त प्रेम करतात. अनेक लोक तर आपल्या बाळाप्रमाणे आपल्या पाळीव श्वानांवर प्रेम करतात. याची प्रचिती या कार्यक्रमात आली. या श्वानांच्या सजावटीकडे लहान मुलांप्रमाणे काळजी या श्वानांच्या मालकांनी घेतल्याचे दिसून आले.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, मेसर्स प्रतिक प्रापर्टीज तर्फे प्रोप्रायटर श्री.जिगर कुमुद्राय मेहता यांचा कार्यालयीन पत्ता : शॉप नं.५, फ-२ बिल्डींग, सेक्टर १५, नेरुळ, नवी मुंबई-४००७०६, यांना सिडको लि. यांनी लागू केलेल्या गावठाण विस्तार योजनेंतर्गत भूखंडाचे हस्तांतरण करण्यात आले असून, त्या भूखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**हस्तांतरण झालेल्या भूखंडाचे वर्णन**

| गांव | भूखंड क्रं. | सेक्टर | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|
| करंजाडे | A-११७ | ०६ | १९९.४१ |

वरील भूखंडावर मेसर्स प्रतिक प्रापर्टीज यांनी प्रतिक गार्डन या इमारतीचे बांधकाम पूर्ण केले असून, त्या इमारतीमधील सर्व निवासी सदनिका व गाळे यांची विक्री माझ्या अशिलांचे नांवे म्हणजेच मे.प्रतिक गार्डन सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादितचे सभासद यांच्या नावे करण्यात आलेली आहे.

सदरहू भूखंड हा माझ्या अशिलांचे नांवे हस्तांतरीत करणे वरील इसमांवर बंधनकारक असून, यापूर्वी निष्पादीत केलेल्या निवासी सदनिका व गाळे यांच्या विक्री करारांची पुर्तता वरील इसमांनी करून देणे त्यांचेवर बंधनकारक आहे. तसेच सदरहू भूखंड हस्तांतरीत करण्यापूर्वी तो निर्वेध, बिनकर्जी, बोजारहीत व निजोखमी असणे आवश्यक आहे. जर सदरहू भूखंडावर अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध विक्री, बक्षिसपत्र, कुलमुखत्यारपत्र, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसा हक्क, लिज, लीन, चार्ज, पोटगी ताबा-कब्जा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, वा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत खालील पत्यावर पुराव्यासह लेखी पत्रानिशी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही, कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत आली नाही, तर सदरहू भूखंडाच्या हस्तांतरणाची प्रक्रिया माझ्या अशिलांच्या नावे पूर्ण करण्यात येईल याची नोंद घ्यावी, कळावे.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २६/१२/२०२२

सही/-
**ॲड.प्रवीण लक्ष्मण पाटील**
**पत्ता : १०२, मंगलकलश को.ऑप.हौ.सोसायटी, महात्मा फुले रोड, पनवेल-४१०२०६**



श्री.मुजावर सो.कोर्ट
प्रोसेस फी जमा रु.१२.५० अर्जदारतर्फे वकील श्री.नंदु म्हात्रे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन सो.यांचे कोर्टात
सि.चौ.अर्ज नं.१४२३/२०२१
नि.नं.२२/ड
ने.ता.१८/०१/२०२३

श्री.चांदनी जगदिपसिंग ठाकूर व इतर — अर्जदार
विरुद्ध
श्री.मनोज अमरचंद्र पाटील — सामनेवाला

सर्व लोकांस कळविण्यात येते की, अर्जदार सौ.चांदनी जगदिपसिंग ठाकूर उर्फ रंजना अमरचंद्र पाटील, विद्या दत्तात्रेय थळे, पुजा कुमार फणसेकर व सामनेवाला मनोद अमरचंद्र पाटील यांचे वडील कै.अमरचंद्र हासू पाटील हे दि.१९/०७/२०१८ रोजी मयत झाले आहेत. त्यांची आई कै.प्रमोदिनी अमरचंद्र पाटील या दि.०६/०८/२०२० रोजी पनवेल येथे मयत झाल्या आहेत. त्यांचे मयताचे दाखल सिव्हील चौकशी अर्ज नं.१४२३/२०२१ मध्ये दाखल आहेत. तसेच कै.अमरचंद्र हासू पाटील यांचा मुलगा कै.संजय अमरचंद्र पाटील हे दि.२०/०५/२०१४ रोजी पनवेल येथे मयत झाले व त्यांचे वारस म्हणून अर्जदार नं.४ पत्नी गीतांजली संजय पाटील, मुलगी अर्जदार न.५ कु.शाल्मली संजय पाटील व मुलगी अर्जदार नं.६ कु. ईश्वरी संजय पाटील हे आहेत. तसेच सदरील कै.अमरचंद्र हासू पाटील यांची आई राधाबाई हासू पाटील या देखील मयत झालेल्या आहेत व त्यांस अर्जदार व सामनेवाला हेच वारसदार आहेत. अशा प्रकारे सदरील मयत कै.अमरचंद्र हासू पाटील व कै.प्रमोदिनी अमरचंद्र पाटील यांचे कायदेशीर वारस म्हणून त्यांचे स्थावर मिळकतींना म्युनिसिपल दफ्तरी नोंदी होणेकरिता सदरील अर्जदार नं.१ सौ. चांदनी जगदिपसिंग ठाकूर उर्फ रंजना अमरचंद्र पाटील, नं.२ विद्या दत्तात्रेय थळे, नं.३ पुजा कुमार फणसेकर, नं.४ गितांजली संजय पाटील, ५ कु.शाल्मली संजय पाटील व नं.६ कु.ईश्वरी संजय पाटील व सामनेवाला मनोज अमरचंद्र पाटील यांस वारसदाखल्याची गरज भासली. सदरील कै.प्रमोदिनी अमरचंद्र पाटील व कै.अरमचंद्र हासू पाटील यांचे वारसपणाबाबत व त्यांच्या असलेल्या स्थावर मिळकती संदर्भात अन्य कुणाचीही खरेदीखत, मृत्यूपत्र, हक्कसोडपत्र, बक्षिसपत्र इ. बाबत कसलीही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत सदरील चौकशी अर्जात कागदपत्रांसहीत दाखल करावी. सदरचे मुदतीत कुणाचीही हरकत न आल्यास कै.प्रमोदिनी अमरचंद्र पाटील व कै.अमरचंद्र हासू पाटील यांचे अर्जदार नं.१ ते ६ व सामनेवाला हेच वारसदार असल्याचे समजण्यात येईल व त्यांचे नावे वारसदाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या हरकतींचा कोणत्याही प्रकारे विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी श्री.राजेंद्र गोमाजी म्हात्रे रा.घर नं. क्र.१०, शहापूर रोड, पेझारी, पोयनाड, ता.अलिबाग, जि.रायगड व श्री.प्रमोद वामन येरुणकर रा.१६/ए, न्यू बिल्डींग वाल्केश्वर, मलबार हिल, वाल्केश्वर रोड, राजभवन, मुंबई यांच्या मालकी वहिवाटीच्या मौजे : कुडावे, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालीलप्रमाणे सविस्तर वर्णन केलेल्या जमीन मिळकती आहेत.

**जमीन मिळकतीचे वर्णन**
**मौजे : कुडावे, ता.पनवेल, जि.रायगड येथील**

| अ.क्र. | सर्व्हे क्रमांक | हिस्सा क्रमांक | एकूण क्षेत्र पोटखराब्यासह हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| १ | २५ | ६ | ०-१०-०० | १.८१ |
| २ | २३ | ६ | ०-२१-० | २.९४ |

वर नमूद केलेल्या मिळकती सदर मिळकतींचे मालक श्री.राजेंद्र गोमाजी म्हात्रे रा.घर क्र.१०, शहापूर रोड, पेझारी, पोयनाड, ता.अलिबाग, जि.रायगड व श्री.प्रमोद वामन येरुणकर रा.१६/ए, न्यू बिल्डींग वाल्केश्वर, मलबार हिल, वाल्केश्वर रोड, राजभवन, मुंबई यांच्याकडून आमचे अशिल श्री.सुभाष राघो पाटील, पत्ता : रा.मु.पो. वाघिवली, ता.पनवेल, जि.रायगड यांनी विकसनासाठी घेण्याचे ठरविले आहे.

त्याअर्थी सदर मिळकतींमध्ये अगर त्यांचे कोणत्याही भागांवर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, एम.ओ.यु., हुकूमनामा, मनाई आदेश, वहिवाट, हिस्सा अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क-हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर व्यवहारास कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधित व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत आमच्या वरीलप्रमाणेच्या पत्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतींवरील श्री.राजेंद्र गोमाजी म्हात्रे व श्री.प्रमोद वामन येरुणकर यांचे मालकी हक्क-हितसंबंध निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून आमचे अशिल सदर मिळकती खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल
दि.२६/१२/२०२२

सही/-
**श्री.विशाल अनंत मुंडकर, ॲडव्होकेट**
**शॉप क्र.२, पवन को.ऑ.हौसिंग सोसायटी, कै.रत्नाकर खरे मार्ग, नवीन सेशन कोर्टासमोर, पनवेल-४१०२०६, जि.रायगड**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## द्रोणागिरी जिल्हास्तरीय चित्रकला स्पर्धेत अक्षर कडू प्रथम

**दै.रायगड नगरी । उरण**

द्रोणागिरी स्पोर्ट आसोशिएशन आयोजित रायगड जिल्हा स्तरीय चित्रकला स्पर्धेत अक्षर सुभाष कडू या विद्यार्थ्याने प्रथम क्रमांक पटकावला आहे. अक्षर कडू हा चिरनेर येथील प्रार्थमिक शाळेत इयत्ता चौथीमध्ये शिकत आहे. अक्षरच्या गटात संपूर्ण जिल्ह्यामधून ८० हुन अधिक स्पर्धक सहभागी झाले होते. विशेष म्हणजे चित्रकलेचे कोणतेही प्रशिक्षण न घेता अक्षरने हे यश मिळविले आहे.

द्रोणागिरी स्पोर्ट असोशिएशनच्या चित्रकला स्पर्धेत मोठ्या संख्येने स्पर्धक सहभागी झाले होते. अक्षरच्या गटा मध्ये ८० हुन अधिक स्पर्धक असल्याने स्पर्धा चूरशीची झाली. परंतू अक्षरने काढलेले चित्र पाहता हे चित्र प्रथम क्रमांकाचा मानकरी ठरेल हे आगोदरच स्पष्ट झाले होते. एवढे सुंदर चित्र त्याने काढले होते. या आगोदर पहिलीला असतांना सकाळ चित्रकला स्पर्धेत देखील अक्षरने दूसरा क्रमांक पटकवला होता. चित्रकलेचे कोणतेही अधुनिक प्रशिक्षण नसताना आपल्या उपजत कला गूणांच्या जोरावर अक्षर चित्र काढत आहे. यामध्ये इयत्ता १० वी मध्ये शिकत असलेला भाऊ पृथ्विराज कडू व आई सुगंधा कडू मार्गदर्शन करत असतात. त्याच्या या यशाचे चिरनेर मधील नागरीक व राजिप शाळा चिरनेरचे चे मुख्याध्यापक प्रविण म्हात्रे, वर्ग शिक्षीका संगीता गावंड, व शाळेतील सर्व शिक्षकांनी कौतुक केले आहे.

## रंगमंचावरील संधीचे विद्यार्थ्यांनी सोने करावे : रामदास शेवाळे

**दै.रायगड नगरी । कळंबोली**


शालेय विद्यार्थी जीवन हे खूपच आव्हानात्मक असे जीवन आहे. विद्यार्थ्यांना विद्यार्थी दशेत असताना विविध शैक्षणिक ज्ञानाचे आकलन करता येते. ज्ञानाबरोबरच विविध कला विद्यार्थी शालेय जीवनात जोपासत असतात. मात्र या कलागुणांना वाव फक्त शाळांमधून होणाऱ्या वार्षिक स्नेहसंमेलन मधील रंगमंचावरच मिळत असतो. विद्यार्थ्यांना रंगमंचावर आपली कला चांगल्या प्रकारे प्रदर्शित करून आयुष्याला भरारी घेण्याचे स्वप्न पूर्ण करता येते याकरता रंगमंचावरील संधीचे विद्यार्थ्यांनी सोने करावे असे आवाहन येथील सामाजिक कार्यकर्ते व बीमा कॉम्प्लेक्स चे अध्यक्ष रामदास शेवाळे यांनी कळंबोलीत विद्यार्थ्यांना केले.

सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या कळंबोलीतील विद्या संकुलाचे वार्षिक स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आले आहे .या वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन सोमवारी सायंकाळी सहा वाजता कळंबोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पाटील यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आले. या स्नेहसंमेलनाचे अध्यक्षपद बीमा कॉम्प्लेक्स चे विद्यमान अध्यक्ष रामदास शेवाळे यांनी भूषविले होते. या कार्यक्रमास विद्यालयाचे प्राचार्य राजेंद्र पालवे, माजी नगरसेवक विजय खानावकर, मराठी प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापक हेमलता पाटील मुख्याध्यापक सरोज पाटील तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सुधागड विद्या संकुलातील शेकडो विद्यार्थ्यांनी तालुकास्तरीय जिल्हास्तरीय घेण्यात आलेल्या विविध क्रीडा स्पर्धातून विशेष मोठ्या प्रमाणावर शैक्षणिक व कला क्रीडा क्षेत्रात भरारी घेतल्यामुळे याचे अवचित अवचित्य साधून विद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाला भरारी हे नाव देऊन स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आले असल्याचे विद्यालयाचे प्राचार्य राजेंद्र पालवे यांनी सांगितले. या स्नेहसंमेलनामध्ये विद्यार्थ्यांनी आपल्या विविध कला गुणांना वाव देऊन नृत्य सामूहिक नृत्य एकांकिका प्रदर्शित करून उपस्थित पालकांची मने जिंकली.




## भोपाळ येथे आयोजित जम्पिंग शो घोडेस्वारीच्या स्पर्धेत माथेरानच्या किरण आखाडेची नेत्रदीपक कामगिरी !



**दै.रायगड नगरी । माथेरान**

ज्युनियर राष्ट्रीय जम्पिंग शो घोडेस्वारी स्पर्धा इक्वेस्टएरियन फेडरेशन ऑफ इंडिया ने भोपाळ(मध्य प्रदेश) येथे नुकतीच आयोजित केली होती. या स्पर्धेत देशभरातून ३४ स्पर्धकांनी भाग घेतला होता. घोड्यांच्या जम्पिंग शो स्पर्धेत माथेरानच्या किरण आखाडे यांनी दोन वेगळ्या स्पर्धेत द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला. किरण बेंगलोरच्या युनायटेड क्लब कडून स्पर्धेत सहभागी झाला होता.

माथेरान हे घोड्यांचे माहेरघर आहे या गावातून स्थानिक त्याचप्रमाणे परिसरातून येऊन इथे स्थायिक झालेले जागतिक कीर्तीचे अनेक घोडेस्वार (जॉकी) याच माथेरानच्या भूमीत निर्माण झाले आहेत.

किरण आखाडे याने घोडेस्वारीचे कौशल्य माथेरान येथे आत्मसात केलेले असून बंगलोर क्लब मध्ये घोडे जम्पिंग शोचे कौशल्य शिकला आहे. मागील काळात माथेरान मधील अनेक मुलांनी विविध क्षेत्रात राज्यपातळीवर तसेच परदेशात जाऊन आपले करियर निर्माण केलेले आहे. शैक्षणिक क्षेत्र असो किंवा क्रीडा स्पर्धा असोत त्यातच घोडेस्वारी मध्ये सुध्दा अनेक जणांनी आपला ठसा उमटवला आहे. वयाच्या अवघ्या विसाव्या वर्षी किरण दिनेश आखाडे याने जम्पिंग शो मध्ये नेत्रदीपक कामगिरी केली असल्याने त्याचे सर्व स्तरातुन कौतुक होत आहे.


CIDCO
WE MAKE CITIES

# CITY AND INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA Ltd.
# शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित

## NOTICE

**UNDER SECTION 60(2) OF THE MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966**
**Town Planning Scheme No. 08 (TPS-08)**
**No. CIDCO/Planning/NAINA/CP/DP/TPS-08/2022/2025**

WHEREAS, the Government of Maharashtra in exercise of powers conferred under clause (b) of Sub-section (1) of the Section 40 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act") declared by Notification, No. TPS-1712/475/CR-98/12/UD-12, dated 10th January, 2013 and subsequent amendment (hereinafter referred to as "the said Notification") City and Industrial Development Corporation of Maharashtra Limited (being a company owned and controlled by the Government of Maharashtra) (hereinafter referred to as "the Corporation") as Special Planning Authority (hereinafter referred to as "the SPA") for Navi Mumbai Airport Influence Notified Area (NAINA) (hereinafter referred to as "said notified area") as specified therein;

And whereas, the Government of Maharashtra vide Notification No. TPS-1215/245/CR-332/2015/SM/UD-12, dated 27.04.2017 has sanctioned the Interim Development Plan (IDP) for the 23 villages of NAINA, and also vide Notification No. TPS. 1215/245/C.R.332/16/EP/UD-12, dated 01.03.2019 has sanctioned the Excluded Parts of the IDP under Section 31(1) of the said Act;

And whereas, the Government of Maharashtra vide Notification No. TPS-1717/MIS-2750/C.R.91/2019/UD-12, dated 16.09.2019 has sanctioned the Development Plan (DP) for 151 villages of NAINA and also vide Notification No. TPS. 1221/1041/C.R.71/21/UD-12, dated 24.06.2022 has partly sanctioned the Excluded Parts of the DP under Section 31(1) of the said Act;

And whereas, the Board of CIDCO vide Resolution No. 12287, dated 16.01.2020, had declared its intention under sub-section (1) of Section 60 of the said Act, for making Town Planning Scheme No. 08 (hereinafter referred to as "TPS-08") at Part villages of Pali Khurd, Moho, Chikhale and Belavali of Taluka Panvel, District Raigad and a notice about declaration of making Scheme No. 08 has been published in the Extraordinary Official Maharashtra Government Gazette (Part-II) dated 28.01.2020 as well as in the daily newspapers "Ram Prahar" and "Lok Drushti" in English and Marathi dated 03.02.2020 under sub-section (2) of Section 60 of the said Act;

And whereas, in accordance with the amended provisions of section 148(A) of the said Act, vide Maharashtra Regional and Town Planning (Amendment) Ordinance 2020 (Maharashtra Act No. XIX of 2020), in computing the period, in relation to any Development Plan, Regional Plan or Scheme under the provisions of Chapter II, III, IV and V of the said Act, the period of periods during which any action could not be completed under the said chapters, due to enforcement of any Guidelines or lockdown measures by the Government of India or the state Government, as the case may be, to prevent the spread of any pandemic or epidemic or disaster situation arising in the Country or State shall be excluded;

And whereas, such prescribed time limit is still in existence on excluding the period of lockdown declared due to spread of Covid-19 virus in the State of Maharashtra, by the Government from 23.03.2020;

And whereas, VC&MD, CIDCO in accordance with the powers delegated by CIDCO Board vide Resolution No. 12551, dated 02.04.2022, had accorded approval for inclusion of additional area in declared TPS-8 under Section 62 of the said Act and CIDCO declared its intention for making Town Planning Scheme at additional area in part villages of Ambivali, Wangani Tarf Waje and Lonivali of Taluka–Panvel, District Raigad under Sub-section (1) of Section 60 of the Act and published a notice about declaration of making TPS-08 with additional area in the Maharashtra Government official Gazette (Part-II) dated 25-31.08.2022 as well as in the daily newspapers "The Free Press Journal" and "Raigad Nagri" in English and Marathi dated 02.09.2022 under Sub-Section (2) of Section 60 of the said Act;

And whereas, all the orders that are currently in force for the imposition of restriction related to COVID-19 under Disaster Management Act, 2005 are withdrawn and no longer be in force from 01.04.2022 by order of Department of Revenue and Forest, Disaster Management, Relief and Rehabilitation dated 31.03.2022;

And whereas, both the declarations of intention published in Maharashtra Government official gazette vide CIDCO/NAINA/CP/BN-36/TPS8/2020 dated 28.01.2020 and vide CIDCO/NAINA/CP/BN-36/TPS-08/2022/1688 dated 25-31.08.2022 to prepare TPS-08 have lapsed and any such lapse in declaration does not debar the Planning Authority from making fresh declaration any time in respect of the same area as per Sub-section (2) of Section 61 of the said Act;

Now therefore, Board of CIDCO acknowledged the insufficient time left to prepare Draft scheme and accorded approval for fresh declaration of Town Planning Scheme No. 08 with same scheme boundary under Sub-section (2) of with Section 61 of the said Act, vide Resolution No. 12631, dated 09.12.2022, and at the same time declared its intention for making Town Planning Scheme No.08 at part of all villages bounded by PINK border as shown on declaration plan, namely; Ambivali, Belavali, Chikhale, Lonivali, Moho, Pali Khurd and Wangani Tarf Waje of Taluka Panvel, District Raigad under Sub-section (1) of Section 60 of the said Act.

Now, therefore, in exercise of the powers conferred by Sub Section (2) of the Section 60 of the said Act, the Corporation hereby publishes its declaration of making Town Planning Scheme No. 08 (TPS-8) at part area of all villages bounded by PINK border as shown on declaration plan, namely; Ambivali, Belavali, Chikhale, Lonivali, Moho, Pali Khurd and Wangani Tarf Waje of Taluka Panvel, District Raigad.

Land owners who are having valid building permission obtained from Competent Authority, falling within the area included in proposed TPS-08 (shown by PINK border on plan) at part area of all villages bounded by PINK border as shown on declaration plan, namely; Ambivali, Belavali, Chikhale, Lonivali, Moho, Pali Khurd and Wangani Tarf Waje of Taluka Panvel, District Raigad are requested to submit details of the same to NAINA office. Participants having land ownership jointly or severally willing to obtain a single final plot are requested to submit their consent under section 65 of the said Act for providing single plot preferably within 15 days.

In accordance with the provisions of Section 60(3) of the said Act, a copy of the declaration along with the plan showing the area included in the Town Planning Scheme No. 08 (shown by PINK border) is kept open for inspection by the public in the office of Chief Planner (NAINA), 8th Floor, Tower No. 10, Belapur Railway Station Complex, CBD Belapur, Navi Mumbai 400 614 during office hours.

Copies of the map showing the area to be included are also kept for inspection in the Grampanchayat offices of the villages included in the said Town Planning Scheme. Copy of the notice & plans are available on CIDCO's website http://cidco.maharashtra.gov.in/NAINA.aspx.

The area included in Town Planning Scheme No.8 (TPS-8) is bounded as stated below;

On the North - Boundary of TPS-6 and NAINA Jurisdiction & Matheran Eco Sensitive Zone (MESZ) Boundary
On the East - Notified ITP Boundary at village Lonivali & Palikhurd & Belavali Village Boundary
On the South - Boundary of TPS-1 (Pocket-2), TPS-2(Pocket-2), TPS-9, Sangade & Borle Village Boundary
On the West - Mumbai – Pune Expressway along village Chikhale

By the order of Board of Directors of the Corporation.
Regd. Office : Nirmal, 2nd floor, Nariman Point, Mumbai-400 021.
Date : 21.12.2022

**(Ravindrakumar M. Mankar)**
**Chief Planner (NAINA)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**

## सूचना

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ६० च्या उपकलम (२) नुसार**
**नगर रचना परीयोजना क्रमांक ०८ (टीपीएस-०८)**
**क्र. सिडको/नियोजन/नैना/मु. नि./वि.आ./टीपीएस-०८/२०२२/२०२५**

ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन आणि नगररचना अधिनियम १९६६ (महा. अधिनियम XXXVII, १९६६ ) (येथून पुढे उक्त अधिनियम असे निर्देशित करण्यात येईल), च्या कलम ४० च्या उपकलम (१) मधील खंड (ब) द्वारा प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभाग (नविवि) ने अधिसूचना क्रमांक टीपीएस-१७१२/४७५/प्र.क्र.-९८/१२/नवि-१२, दिनांक १० जानेवारी २०१३ व वेळोवेळी झालेल्या सुधारणा अन्वये त्यात नमूद केल्याप्रमाणे, नवी मुंबई विमानतळ प्रभावित अधिसूचित क्षेत्र (नैना), (येथून पुढे उक्त क्षेत्र असे निर्देशित करण्यात येईल) साठी शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित (महाराष्ट्र शासनाच्या मालकीची व नियंत्रणाखालील कंपनी) (येथून पुढे महामंडळ असे निर्देशित करण्यात येईल) म्हणजे सिडकोची विशेष नियोजन प्राधिकरण (येथून पुढे वि.नि.प्रा.असे निर्देशित करण्यात येईल) म्हणून नेमणूक केली आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने अधिसूचना क्र. टीपीएस -१२१५/२४५/सीआर -३३२/२०१५/एस.एम./यूडी-१२, दिनांक २७ एप्रिल २०१७ नुसार नैनातील २३ गावांसाठी अंतरिम विकास आराखडा मंजूर केला आहे आणि अधिसूचना क्र. टीपीएस. १२१५/२४५/प्र.क्र. ३३२/१६/ई.पी./नवि-१२ दिनांक १ मार्च २०१९ अन्वये अधिनियमाच्या कलम ३१ च्या उप-कलम (१) नुसार अंतरिम विकास आराखड्याचा वगळलेले भाग मंजूर केले आहे;

आणि ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने अधिसूचना क्र. टीपीएस-१७१७/एमआयएस २७५०/सीआर-९१/२०१९/यूडी-१२, दिनांक १६ सप्टेंबर, २०१९ नुसार नैनातील १५१ गावांसाठी विकास आराखडा मंजूर केला आहे आणि अधिसूचना क्र. टीपीएस. १२२१/१०४१/प्र.क्र. ७१/२१/नवि-१२ दिनांक २४ जून २०२२ अन्वये अधिनियमाच्या कलम ३१ च्या उपकलम (१) नुसार विकास आराखड्याचा वगळलेले भाग अंशतः मंजूर केले आहे;

आणि ज्याअर्थी , सिडको संचालक मंडळाच्या दिनांक १६ जानेवारी २०२० रोजीच्या ठराव क्र. १२२८७ अन्वये रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यातील पाली खुर्द, मोहो, चिखले, आणि बेलवली यांच्या काही भागात नगररचना परीयोजना क्रमांक ०८ (येथून पुढे टीपीएस-०८ असे निर्देशित करण्यात येईल) करण्याकरीता, उक्त अधिनियमातील कलम ६० च्या उप-कलम (१) नुसार त्याचा उद्देश घोषित केला आहे. आणि उक्त अधिनियमाच्या कलम ६० च्या उप-कलम (२) मध्ये नमूद तरतूदीनुसार टीपीएस-०८ करण्याच्या उद्देशाची घोषणा दिनांक २८ जानेवारी २०२० रोजीच्या अधिकृत महाराष्ट्र शासकीय राजपत्रात असाधारण (भाग-२) आणि स्थानिक वृत्तपत्र "राम प्रहर" आणि "लोक दृष्टी" यांत दिनांक ०३ फेब्रुवारी २०२० रोजी प्रकाशित करण्यात आली आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन नगररचना (सुधारणा) अध्यादेश २०२० (सन २०२० चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १९) द्वारे, उक्त अधिनियमाच्या कलम १४८ (अ) मधील सुधारित तरतुदीनुसार, अधिनियमातील प्रकरणे दोन, तीन, चार व पाच मधील तरतुदीप्रमाणे, कोणत्याही विकास योजना, प्रादेशिक योजना किंवा योजनांसाठीचा कालावधी विचारात घेताना, देशामध्ये किंवा राज्यामध्ये उद्भवणाऱ्या कोणत्याही महामारीच्या किंवा साथीच्यारोगाच्या फैलावास किंवा आपत्ती जन्य परिस्थितीस प्रतिबंध करण्याकरिता, भारत सरकारने किंवा, यथास्थितो, राज्य शासनाने केलेल्या कोणत्याही मार्गदर्शक तत्त्वांच्या किंवा टाळेबंदी उपाययोजनांच्या अंमलबजावणीमुळे, उक्त प्रकरणानुसारची कोणतीही कार्यवाही पूर्ण होऊ शकली नसेल तर, असा कालावधी वगळणे आवश्यक आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त विहित कालावधी, महाराष्ट्र राज्यात दिनांक २३ मार्च २०२० पासून कोव्हीड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावामुळे जाहीर केलेला टाळेबंदीचा कालावधी वगळता अजून अस्तित्वात आहे;

आणि ज्याअर्थी, उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांनी, सिडको संचालक मंडळाच्या दिनांक २ एप्रिल २०२२ रोजीच्या ठराव क्र. १२५५१ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, घोषित केलेल्या नगररचना परीयोजना क्रमांक ०८ मध्ये रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यातील वांगणी तर्फ वाजे, अंबिवली व लोणिवली गावांच्या काही भागाच्या समावेशासाठी उक्त अधिनियमातील कलम ६२ नुसार मंजूरी दिली आणि उक्त अधिनियमातील कलम ६० च्या उप-कलम (१) नुसार सदर भागात, नगररचना परीयोजना करण्याच्या उद्देशाची घोषणा दिनांक २५ ते ३१ ऑगस्ट २०२२ रोजीच्या अधिकृत महाराष्ट्र शासन राजपत्र (भाग-२) आणि स्थानिक वृत्तपत्र 'फ्री प्रेस जर्नल' आणि 'रायगड नगरी' यांत दिनांक २ सप्टेंबर २०२२ रोजी प्रकाशित करण्यात आली आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासन महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय मुंबई यांनी दिनांक ३१ मार्च २०२२ रोजी निर्गमित केलेल्या आदेशानुसार आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ या कायद्याअंतर्गत यापूर्वी कोव्हीड-१९ बाबत लावण्यात आलेले सर्व निर्बंध हे दिनांक १ एप्रिल २०२२ पासून मागे घेण्यात आले आहेत;

आणि ज्याअर्थी, टीपीएस-०८ तयार करण्याकरीत महाराष्ट्र शासन अधिकृत राजपत्रात क्रमांक सिडको/नैना/मु. नि./बीएन-३६/टी.पी.एस.-८/२०२० अन्वये दिनांक २८ जानेवारी २०२० रोजी व क्र. सिडको /डीपी(नैना)/टीपीएस-०८/२०२२/१६८८ अन्वये दिनांक २५ ते ३१ ऑगस्ट २०२२ रोजी प्रसिद्ध झालेल्या घोषणा व्यपगत झाल्या आहेत आणि अशा घोषणा कोणत्याही प्रकारे व्यपगत झाल्यामुळे नियोजन प्राधिकरणास त्याच क्षेत्राच्या संबंधात कोणत्याही वेळी नवीन घोषणा करण्यास उक्त अधिनियमातील कलाम ६१ च्या उप-कलम (२) नुसार प्रतिरोध असणार नाही.

आता म्हणून, प्रारूप परियोजना तयार करणेकरीता पुरेसा कालावधी उपलब्ध नसल्याची दखल घेऊन सिडको संचालक मंडळाने आहे तेच सीमाक्षेत्र कायम ठेऊन उक्त अधिनियमाच्या कलम ६१(२) च्या अनुषंगाने कलम ६० च्या उप-कलम (१) अन्वये टीपीएस–०८ तयार करण्याचा उद्देश नव्याने घोषित करण्यास संचालक मंडळाच्या दिनांक ९ डिसेंबर २०२२ रोजीच्या बैठकीत ठराव क्र. १२६३१ अन्वये मान्यता दिली आणि त्याचवेळी उक्त अधिनियमाच्या कलम ६० च्या उप-कलम (१) अन्वये नकाशात दर्शविल्याप्रमाणे गुलाबी रंगाच्या सीमेत समाविष्ट क्षेत्रातील सर्व गावांच्या काही भागात म्हणजेच रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यातील मौजे अंबिवली, बेलवली, चिखले, लोणीवली, मोहो, पाली खुर्द व वांगणी तर्फ वाजे येथे नगररचना परीयोजना क्रमांक ०८ (टीपीएस–०८) करण्याचा इरादा घोषित केला आहे.

आता, म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम ६० च्या उपकलम (२) द्वारा प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन, महामंडळ याद्वारे नकाशात दर्शविल्याप्रमाणे गुलाबी रंगाच्या सीमेत समाविष्ट क्षेत्रातील सर्व गावांच्या काही भागात म्हणजेच रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यातील मौजे अंबिवली, बेलवली, चिखले, लोणीवली, मोहो, पाली खुर्द व वांगणी तर्फ वाजे येथे नगररचना परीयोजना क्रमांक ०८ (टीपीएस–०८) करण्याचा इरादा घोषित करत आहे.

प्रस्तावित टीपीएस–०८ मध्ये नकाशात दर्शविल्याप्रमाणे गुलाबी रंगाच्या सीमेत समाविष्ट क्षेत्रातील सर्व गावांच्या काही भागात म्हणजेच रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यातील मौजे अंबिवली, बेलवली, चिखले, लोणीवली, मोहो, पाली खुर्द व वांगणी तर्फ वाजे येथील जमिनीवर सक्षम प्राधिकरणाकडून वैध बांधकाम परवानगी मिळाली असल्यास अशा परवानगीचा तपशील नैना कार्यालयाकडे सादर करण्याची जमीन मालकांना विनंती करण्यात येत आहे. योजनेत सहभागी असलेल्या जमीन मालकांची संयुक्तीकपणे किंवा वैयक्तिकरित्या जमीन असेल आणि असे जमीन मालक एकच अंतिम भूखंड मिळविण्यास इच्छुक असतील तर त्याना उक्त अधिनियमाच्या कलम ६५ नुसार एकच अंतिम भूखंड मिळणेसाठी शक्यतो १५ दिवसाच्या आत संमती देण्यास विनंती आहे.

उक्त अधिनियमाच्या कलम ६० च्या उपकलम (३) च्या तरतुदींनुसार, नगररचना परीयोजना क्रमांक ०८ ची घोषणा व त्यामध्ये अंतर्भूत करण्यात येणारे क्षेत्र (गुलाबी रंगाच्या सीमेने) दर्शविणाऱ्या नकाशाची प्रत जनतेच्या तपासणीसाठी मुख्य नियोजनकार (नैना), ८वा मजला, टॉवर नं. १०, बेलापूर रेल्वे स्थानक संकुल, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४ येथे कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहेत.

विषयांकित परियोजनेचे सिमाक्षेत्र दर्शविणारा नकाशा संबधित गावांच्या ग्रामपंचायत कार्यालयात तपासणीसाठी उपलब्ध राहतील. सदर सूचना व नकाशा सिडकोचे संकेतस्थळ http://cidco.maharashtra.gov.in/NAINA.aspx. येथे सुद्धा उपलब्ध राहतील.

नगर रचना परीयोजना क्रमांक ०८ मध्ये समाविष्ट असलेल्या क्षेत्राच्या चतु:सिमा खालीलप्रमाणे आहेत.

उत्तरेला - नगररचना परीयोजना क्रमांक ६ ची हद्द आणि नैना व माथेरान पर्यावरणीय संवेदनशील (MESZ) क्षेत्राची हद्द
पूर्वेला - लोणीवली गावातील अधिसूचित एकात्मिक नगर वसाहत प्रकल्पाची हद्द आणि पालीखुर्द व बेलवली गावाची हद्द
दक्षिणेला - नगररचना परीयोजना क्रमांक ०९, ०१ आणि ०२ (पॉकेट -२) ची हद्द, सांगडे आणि बोरले गावाची हद्द
पश्चिमेला - मुंबई पुणे द्रुतगती मार्ग (मौजे चिखले)

सिडको संचालक मंडळाच्या आदेशानुसार.
नोंदणीकृत कार्यालय : निर्मल, २ रा मजला, नरीमन पॉइंट, मुंबई ४०० ०२१
दिनांक : २१.१२.२०२२

**(रविंद्रकुमार म. मानकर)**
**मुख्य नियोजनकार (नैना)**

**CIDCO/PR/384/2022-23**

# पारंपारिक मच्छीमार बचाव कृती समितीचा विजयी मेळावा

## १६३० कुटुंबियांचा यशस्वी संघर्ष ; १७ वर्षाच्या लढ्याला आले यश

**दै.रायगड नगरी । उरण**

मोरा प्रवाशी धक्का व जेएनपीटी शेवा यांच्या दरम्यानचे मासेमारी जमिनीत छ्चडएन ने प्रवाशी व इतर धक्के बांधण्याची योजना आखली होती. त्या मासेमारी जमिनीचे भुईभाडे जेएनपीटीला देण्याचा छ्चडएन व गछ्झढ या दोन कंपन्यात करार झाला होता. म्हणून जेएनपीटीने NMSEZ ला प्रवाशी व इतर धक्के बांधण्याची परवानगी दिली होती. त्या वेळी पारंपारिक मच्छिमार बचाव कृती समितीने मासेमारी जमिनीचा मोबदला पारंपारिक मच्छिमारांनी जेएनपीटी प्रशासनाला मागितलेला होता. मात्र मच्छीमारांना मोबदला देण्यात आला नाही. तसेच पुनर्वसनही करण्यात आलेले नव्हते. २००५ सालापासून मच्छिमार बांधव आपल्या मागण्यासाठी लढत होते शेवटी डिसेंबर २०२२ मध्ये या लढ्याला यश मिळाले असून सर्वोच्च




न्यायालय दिल्लीने मच्छिमार बांधवाना नुकसान भरपाई देण्याचे आदेश जेएनपीटी व संबंधित कार्यालयांना दिले. त्या अनुषंगाने विजयाचा जल्लोष करण्यासाठी व हा लढा अधिक तीव्र करण्यासाठी पारंपरिक मच्छिमार बचाव कृती समिती तर्फे दिनांक २५/१२/२०२२ रोजी सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत हनुमान मंदिर, हनुमान कोळीवाडा, उरण येथे मच्छीमारांचा विजयी मेळावा संपन्न झाला.

सर्वोच्च न्यायालयात केस जिंकल्याने उरण हनुमान कोळीवाडा येथे विजयी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी रमेश कोळी, अरुण शिवकर, नंदकुमार पवार, रामदास कोळी, प्राची कोळी, कैलास कोळी, भारत कोळी, लक्ष्मण कोळी, दिलीप कोळी, अॅड.गोपीनाथ पाटील (कायदेविषयक सल्लागार), प्राध्यापक गीतांजय साहू (टाटा सामाजिक संस्था मुंबई ), परमानंद कोळी, सुरेश कोळी, रमेश कोळी, मंगेश कोळी, कृष्णा कोळी आदी पारंपारिक मच्छिमार बचाव कृती समितीचे पदाधिकारी सदस्य यावेळी उपस्थित होते. यावेळी विजयी मेळाव्यात २००५ पासून ते २०२२ पर्यंत कश्या पद्धतीने लढा देण्यात आला याविषयी माहिती देण्यात आली. या मेळाव्यात उरण पनवेल तालुक्यातील तसेच हनुमान कोळीवाडा, उरण कोळीवाडा, बेलपाडा कोळीवाडा, गव्हाण कोळीवाडा या चार गावातील मच्छिमार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संक्षिप्त...

## एम पी एस एस स्कुल कोलाडचा वार्षिक क्रीडा महोत्सव साजरा

**दै.रायगड नगरी । रोहा**

एम.पी.एस.एस.इंग्लिश मिडीयम स्कूल आंबेवाडी-कोलाडचा वार्षिक क्रीडा महोत्सव मोठ्या उत्सव पार पडला.

२२ डिसेंबर रोजी सुरू करण्यात आलेल्या या क्रीडा महोत्सवाला प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त शासकीय अधिकारी सूर्यकांत विरकर व त्यांच्या पत्नी स्नेहा विरकर यांना निमंत्रित करण्यात आले होते तर सोहळ्याचे उद्घाटन शाळेचे उपाध्यक्ष सुनील महाडिक यांच्या हस्ते करण्यात आले. पाहुण्यांचे आगमन होताच दहावीच्या विद्यार्थ्यांनी त्यांना दिलेली मानवंदना ही पाहुण्यांना भारावून टाकणारी होती क्रीडांगणावरील व्यासपीठावर पाहुणे म्हणून विराजमान होतात क्रीडा स्पर्धेची ओळख असणारी मशाल मैदानात फिरवण्यात आली. पाहुण्यांचा सत्कार सुनील महाडिक यांच्या हस्ते करण्यात आला तसेच शाळेचे उपाध्यक्ष सुनील महाडिक, शाळेच्या मुख्याध्यापिका वैशाली महाडिक आणि स्पोर्ट्स कॅप्टन यांचेही स्वागत करण्यात आले. त्यानंतर सर्वांनी सांगीक कवायत आणि केजी पासून सातवीपर्यंतच्या प्रत्येक वर्गाने क्रीडा साहित्यावर आधारित कवायत सादर केली. या सगळ्यांचे आकर्षण ठरले ते केजीच्या विद्यार्थ्यांनी कवायत कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी सादर करण्यात आलेल्या कवायतीने प्रमुख पाहुण्यांना मंत्रमुग्ध केले. नंतर आठवीच्या विद्यार्थ्यांनी लेझीम नृत्य दाखविले तर नववीच्या विद्यार्थ्यांनी मल्लखांबाचे प्रकार अतिशय शिस्तबद्ध सादर केले कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरली. कार्यक्रमाच्या शेवटी प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले सूर्यकांत वीरकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन पर भाषण केले.

**वाचकांना विनम्र सूचना**

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

## यावर्षी देखील नारळ सुपारीच्या उत्पन्नामध्ये लक्षणीय घट ; खराब हवामानाचा बागायतदारांना फटका

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

यावर्षी देखील लहरी व खराब हवामानामुळे बागायतदारांना खूप मोठ्या प्रमाणावर फटका बसण्याची शक्यता आहे. कारण नारळ व सुपारीच्या उत्पन्नामध्ये यावर्षी देखील मोठ्या प्रमाणावरती लक्षणीय घट होत असल्याचे पाहायला मिळत आहे. ३ जून २०२० रोजी आलेल्या निसर्ग चक्रीवादळाने हरिहरेश्वर व श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावरील नारळ व सुपारीच्या वाड्या अक्षरशः झोपवून टाकल्या होत्या. नारळ व सुपारी ची ७०% झाडे अर्ध्या वरून मोडून पडली तर काही बुंध्यातून उन्मळून पडली. त्यामुळे उत्पन्नामध्ये मोठ्या प्रमाणावर घट झाली होती. परंतु यावर्षी अति पडलेला पाऊस, त्याचप्रमाणे थंडी पडायला लागल्यानंतर देखील वातावरणात होत असलेले बदल यामुळे नारळ व सुपारीच्या फुलांना गळती लागल्याचे पाहायला मिळत आहे.

चार दिवस कडाक्याची थंडी पडते तर आठ ते दहा दिवस उष्मा जाणवतो. यामुळे



झाडांना आलेल्या नवीन फुलांना बुरशी सदृश्य रोग होऊन फुले गळून पडतात. तसेच खारकुंड्या व इतर पक्षी देखील नवीन आलेल्या फुलांचा खूप मोठ्या प्रमाणावरती नाश करतात. त्यामुळे देखील उत्पन्नामध्ये मोठ्या प्रमाणावरती घट होत असते. शासनाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना सुपारीची रोपे मोफत दिली असली तरी सदरची रोपे मोठी होऊन त्याला फळे येण्यासाठी कमीत कमी सात ते आठ वर्षाचा कालावधी लागतो.

तसेच नारळाची नवीन रोपे लावल्यानंतर सुद्धा त्याला फळे येण्यासाठी आठ ते नऊ वर्षाचा कालावधी लागत असल्याने श्रीवर्धन हरीहरेश्वर परिसरातील बागायतदार पूर्णपणे आर्थिकदृष्ट्या अडचणीत सापडलेला पाहायला मिळत आहे. वादळानंतर शासनाने दिलेली नुकसान भरपाई अत्यल्प स्वरूपाची असल्याने बागायतदारांचे कधीही न भरून येणारे नुकसान झालेले आहे. त्यातच यावर्षी लहरी व खराब हवामानामुळे देखील शेतकऱ्यांना किती उत्पन्न हातात येईल? याबाबत चिंता लागून राहिलेली आहे.

## गांजा अमली पदार्थ सेवन केल्या प्रकरणी कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

गांजा अमली पदार्थ सेवन केल्या प्रकरणी तळोजा पोलिसांनी एका इसमा विरोधात कारवाई केली आहे.

तळोजा फेज - २ मेट्रो ब्रिजच्या खाली असलेल्या पान टपरीच्या मागे आरोपी अब्दुल सलाम लियाकत मंडल ( वय ४० ) हा गांजा अमली पदार्थ सिगरेट मध्ये भरून त्याचे सेवन करताना आढळून आल्याने त्याच्या विरोधात तळोजा पोलिसांनी कारवाई केली आहे.

## खारघरमध्ये आढळला अनोळखी मृतदेह

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर शहरात सेक्टर ८ गुडविल पॅराडाईज बिल्डिंग समोरील रस्त्यावर अनोळखी मृतदेह सापडल्याने एकच खळबळ उडाली आहे. संबंधित इसमाची ओळख पटली नसून अंदाजे साधारणतः ४५ वर्षांचा हा मृतदेह आहे. याबाबत खारघर पोलिस ठाण्यात घटनेची नोंद करण्यात आली असून सहायक पोलिस निरीक्षक विवेक दाभोलकर हे या घटनेचा तपास करीत आहेत.

## कामगार नेते महेंद्र घरत यांच्या यशस्वी मध्यस्थीने पंजाब कॉनवेअर सुरु होणार



**दै.रायगड नगरी । उरण**

केंद्र सरकारच्या DPD धोरणामुळे उरण परिसरातील हिंद टर्मिनल, ऑलकार्गो, CWC डी नोड, पंजाब कॉनवेअर सारखे मोठ मोठे CFS बंद होत आहेत. यामुळे हजारो प्रकल्पग्रस्त बेरोजगार होत आहेत. मागील तीन महिन्या पासून पंजाब कॉनवेअर बंद असल्यामुळे कामगारांना पगार नाही. प्रकल्पग्रस्तांचे रोजगार वाचविणे तसेच CFS वाचविणे काळाची गरज आहे. कामगार नेते तथा काँग्रेस रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांनी काळाची गरज ओळखून पंजाब कॉनवेअर व्यवस्थापन व कामगारांसोबत यशस्वी चर्चा करून जानेवारी पासून सर्व कामगारांना घेऊन, किमान वेतना सहित कंपनी सुरु करण्याचा निर्णय घेतला तसा करार आज करण्यात आला.

एकीकडे बंद असलेल्या हिंद टर्मिनल, cwc डी नोड या CFS मधे आलेले कंत्राटदार कंपनी सुरु करताना निम्मे कामगार -निम्या पगारावर घेण्याची अट घालत असताना कामगार नेते महेंद्र घरत यांनी पंजाब कॉनवेअर मधील सर्व कामगार किमान वेतनावर कामावर घेण्याचा करार केला. भविष्यात इतर कंपन्यांतील कामगारांसाठी हा करार एक मैलाचा दगड ठरेल.

स्थानिकांना यामुळे मोठा रोजगारहि उपलब्ध होणार आहे. त्यामुळे कामगार वर्गामध्ये आनंदाचे वातावरण आहे.

## पाली बसस्थानकासमोरील दोन भल्या मोठ्या उघड्या नाल्यातून पसरतेय असह्य दुर्गंधी

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

पाली बसस्थानकासमोरील दोन भल्या मोठ्या व उघड्या नाल्यातून मोठ्याप्रमाणावर दुर्गंधी पसरत आहे. येथील अक्षम्य अस्वछता व असह्य दुर्गंधी यामुळे बसस्थानक व आजूबाजूच्या बाजारपेठेत येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. कोरोना सारख्या जागतिक आजाराने राज्य व देशातील जनतेला बेजार केले होते , आता पुन्हा कोरोना दरवाजा ठोठावत आहे. सर्वत्र स्वच्छता व जनजागृतीवर भर दिला जातोय, अशातच पाली बसस्थानकाचे प्रवेशद्वार असलेल्या मार्गावर मागील अनेक वर्षांपासून दोन मोठे नाले आहेत.

या नाल्यात प्लास्टिक बाटल्या , कुजलेले अन्न, गटाराचे घाणीचे पाणी तुंबत असून अनेक कीटक जीवजंतू ची पैदास होत आहे. शिवाय हे नाले



उघडे असल्याने यातून सतत दुर्गंधी येत असते. या नाल्यात अनेकदा वाहने फसून अपघात झाल्याच्या घटना घडल्या आहेत. या नाल्याच्या बाजूने बसस्थानकात एसटी बस शिरतात व येथूनच बाहेर देखील येतात, त्यामुळे मोठ्या अपघाताची देखील शक्यता आहे. नागरिकांची सातत्याने मागणी होऊन देखील अद्यापपर्यंत या नाल्यांच्या बाबत कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली दिसत नाही. पाली बसस्थानक असल्याने या ठिकाणी सतत नागरिकांची वर्दळ व रहदारी सुरू असते, शिवाय सभोवताली दुकाने, हॉटेल, रसवंती गृह तसेच मच्छी व मटण मार्केट असल्याने नागरिकांची रेलचेल असते. त्यामुळे या नाल्यांमुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. प्रशासनाने तात्काळ या नाल्याचा योग्य तो बंदोबस्त करावा अशी मागणी जन माणसातून जोर धरत आहे.

## मनसे कडून नवनिर्वाचित ग्रामपंचायत सदस्यांचा सत्कार

**दै.रायगड नगरी । उरण**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उरण तालुका उपाध्यक्ष दिपक पाटील हे पिरकोण ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत भरघोस मताधिक्याने सदस्य पदासाठी विजयी झाल्याने मनसेचे जिल्हाध्यक्ष संदेश भाई ठाकूर यांनी आपल्या सहकाऱ्यां समवेत त्यांचा सत्कार केला. तसेच विविध ग्रामपंचायत मध्ये मनसेचे सदस्य निवडून आल्याने त्यांचा सत्कार करण्यात आला. पिरकोन गावाच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच उरण पुर्व विभागातील गोरं गरीब जनतेच्या अडिअडचणी सोडविण्यासाठी मनसेचा एक सैनिक म्हणून प्रयत्नशील राहणार असल्याचे पिरकोन ग्रामपंचायतीचे नवनिर्वाचित सदस्य दिपक पाटील यांनी सांगितले. यावेळी मनसेचे जिल्हाध्यक्ष संदेश ठाकूर, उपजिल्हाध्यक्ष दिपक कांबळी, तालुकाध्यक्ष सत्यवान भगत, उपतालुकाध्यक्ष राकेश भोईर , मंगेश वाजेकर, विभागध्यक्ष बबन ठाकूर, अनिल गावंड, सोमनाथ म्हात्रे, संदीप ठाकूर, दिपक सुतार महिला उपाध्यक्ष कविता म्हात्रे, ललिता म्हात्रे सह मनसे सैनिक उपस्थित होते.



## स्टील चोरट्यांना ८ लाखाच्या मुद्देमालासह पोलिसांनी केली अटक

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

माणगांव पोलीस ठाणे रजि. नं. ३५८/२०२२ भादवि कलम ३७९, ३४ चा गुन्हा दिनांक २० डिसेंबर २०२२ रोजी रात्री ००.३० वा. मौजे कूंभे गावचे हद्दीत घडला असून दि.२१ डिसेंबर २०२२ रोजी सायं. १८.१२ वाजता दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील फिर्यादी ओमकार महादेव शेट्टी, वय - २६ रा. रूम नं ३०४, ए विंग, पी जी रेसिडेन्सी महाड, तालुका महाड हे काम करत असलेल्या धारिया कन्स्ट्रक्शन यांचे मालकीचे मौजे कुंभे धरण येथे चालू असलेले बांधकामाचे ९० हजार रुपयांचे १२०० किलो वजनाच्या टीएमटी स्टीलचे ३२ एम.एम. व २५ एम.एम. गेजचे लोखंडी रॉड निळ्या रंगाच्या टेम्पोत टाकून कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी चोरून नेले.



अशी तक्रार माणगांव पोलिस ठाण्यात दिल्याने वरिष्ठ पोलिस निरिक्षक राजेंद्र पाटील यांचे मार्गदर्शना-खाली या धाडसी चोरीचा तपास सहा.पो.नि. मोहिते, पो.स.ई. गायकवाड, पो.शि. १३६१ शिंदे, पो.शि. १९०५ डोईफोडे, पो.शि. २२२० दहिफळे, पो.शि. ४८८ पाटील, पो. शि. २२२१ सगरे यांचे पथकाने दि २० डिसेंबर रोजी पहाटे या गुन्ह्यातील निळ्या रंगाच्या टेम्पोचा व चोरट्यांचा कसुन शोध घेतला असता, हा निळ्या रंगाचा टेम्पो व त्यामध्ये असलेले आरोपीत १). कार्तिक अशोक वाघमारे वय -२०, २) चेतन अशोक वाघमारे वय - २४, दोन्ही रा. सुकेळी आदिवासीवाडी, ता. रोहा, जि. रायगड, ३) मारूफ रशीद खान वय - ३३ रा. पुगाव, ता रोहा, जि. रायगड यांना पकडण्यात आले आहे.

या गुन्ह्यात ७ लाख रुपये किंमतीचा टाटा कंपनीचा टेम्पो क्र एमएच १४ जेएल २२७८, त्यामधे असलेले ९० हजार रुपयांचे १२८० किलो वजनाचे टीएमटी स्टीलचे ३२ एमएम व २५ एमएम चे लोखंडी रॉड, २ हजार रुपये किंमतीचे एक लोखंड कापायचे गॅस कटर, १० हजार रुपये किंमतीचे दोन भरलेले ऑक्सिजन सिलेंडर, ६ हजार रुपये किंमतीचा एक निळ्या रंगाचा एचपी कंपनीचा १९ किलोग्राम चा एल.पी.जी. गॅस सिलेंडर, असा एकूण ८ लाख ८ हजार रुपये मात्र किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या धाडसी गुन्ह्यातील आरोपींना गुन्ह्याचे कामी अटक करण्यात आली असुन गुन्ह्याचा अधिक तपास चालू आहे. गुन्ह्यातील आणखी पाहिजे असलेल्या आरोपींचा शोध पोलिस वेगाने घेत आहेत.

## पनवेल सेन्ट्रल रोटरी घनदाट वन प्रकल्पाचे दुसऱ्या आणि अखेरच्या टप्प्यातील वृक्षारोपण पार पडले

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रोटरी घनदाट जंगल प्रकल्प अंतर्गत रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल आणि पनवेल महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने पनवेल शहरातील भूखंड क्रमांक २७३ येथे मियावाकी पद्धतीने डेंस फॉरेस्ट तयार करण्यात येणार आहे. या प्रकल्पाअंर्गत पनवेल महानगर पालिकेचे आयुक्त गणेश देशमुख, माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्यासह अन्य मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

पनवेल महानगर पालिकेच्या मालकीच्या भूखंड क्रमांक २७३ येथे डेंस फॉरेस्ट तयार करण्यासाठी रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलला देण्यात आला आहे. या प्रकल्पात लक्ष्मी आय चॅरिटेबल हॉस्पिटल शेजारील नियोजित जागी मियावाकी पद्धतीने डेंस फॉरेस्ट तयार करण्यात येणार आहे. या प्रकल्पाद्वारे वनीकरणाला चालना देण्यात येणार आहे. या प्रकल्पाअंर्गत पनवेल महानगर पालिकेचे आयुक्त गणेश देशमुख, माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्यासह अन्य मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

या कार्यक्रमास 'रोटरी'चे माजी प्रांतपाल डॉ. गिरीश गुणे, माजी नगरसेवक अनिल भगत, माजी नगरसेवक नितीन पाटील, बांधकाम व्यावसायिक मंगेश परुळेकर, रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलचे अध्यक्ष लक्ष्मण पाटील, सचिव अनिल ठकेकर, प्रोजेक्ट चेअरमन सुदीप गायकवाड, अमोद दिवेकर, अभय गुरसळे, डॉ. सुरेश मोरे, श्री वेलणकर , भगवान पाटील, प्रिया पाटील, श्री सैतवडेकर, जे.डी. तांडेल, मेघा तांडेल, रतन खरोल, अनिल खांडेकर, सिकंदर पाटील, डॉ. मिलिंद घरत, डॉ. आवटे, शैलेश पोटे, भारत ठाकूर, आरती खेर, आतिष थोरात, अमित पुजारी, संतोष घोडींदे, सुनिल गाडगीळ, दीपक गडगे, दर्शन वनगे, मनोज आंग्रे, आनंद रंगपरिया यांच्यासह रोटरीचे सदस्य यांच्यासह रोटरीचे इतर सदस्य होते.

